# डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९८५ /२०२५ — दिनांक:– २०/०८/२०२५

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

**ज्याअर्थी,** डोबिंवली वाहतुक उप विभागाच्या हद्दीत **दिनांक २७/०८/२०२५ ते दिनांक ०६/०९/२०२५** रोजी पावेतो गणेशोत्सव सणानिमित्त कल्याण डोबिंवली महानगर पालिकेच्या हद्दीत चोळेगाव तलाव, ठाकुर्ली, डोबिंवली पुर्व येथे गणपती विसर्जन तलाव असुन सदर ठिकाणी **दि. २८/०८/२०२५ रोजी (दीड दिवस), दि. ३१/०८/२०२५ (पाच दिवस), दि. ०२/०९/२०२५ (गौरी विसर्जन दिवस), दि.०६/०९/२०२५ (अनंत चर्तुदशी) असे गणपती विसर्जन होणार आहेत.** गणपती विसर्जन करण्याकरीता सदर ठिकाणी मोठया संख्येने भाविक सहभागी होत असतात. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

**प्रवेश बंद —** **१)** ठाकुर्ली चोळेगाव हनुमान मंदीर कडुन कै. फोशीबाई भोईर चौक/बंदीश पॅलेस हॉटेल कडे जाणारी वाहतुक सर्व प्रकारच्या वाहनांकरीता **ठाकुर्ली हनुमान मंदीर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सदरची वाहने ठाकुर्ली हनुमान मंदीर येथुन डाव्या बाजुला वळन घेवून म्हसोबा चौक, ९० फीट रोड येथुन आपल्या ईच्छित स्थळी जातील.

**सदर वाहतूक अधिसूचना तरी दिनांक २८/०८/२०२५ रोजी ( दीड दिवस ), दिनांक ३१/०८/२०२५ ( पाच दिवस), दिनांक ०२/०९/२०२५ ( गौरी गणपती विसर्जन दिवस ), दिनांक ०६/०९/२०२५ ( अनंत चर्तुदशी ) रोजी दुपारी १४:०० वा. ते गणपती विसर्जन संपेपर्यत अंमलात राहील.**

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत कार्यवाहीस्तव,**

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत कार्यवाहीस्तव** सविनय सादर,

मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली, कोळशेवाडी, कल्याण वाहतूक उपविभाग.